'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
ISSN :2348-7143 (Online)
मराठी भाषा आणि साहित्य विशेषांक Vol. 3 Issue. 3 July-Sept.- 2016

# सभासद बखर :— वाङ्मयीन गुणविशेष

प्रा. डॉ.सावंत नितीश पांडुरंग
मराठी विभाग प्रमुख
जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर ४१६१०१
ई मेल nitishsawant7276@gmail.com
मो.नं. ९८९०९३९८१८

*विषय आणि लेखनाची पद्धती यामुळे बखरीस एक स्वतंत्र वाङ्‍मयप्रकाराचे मूल्य प्राप्त झाले आहे. बखरकार हा कलावंत आहे. त्याला बखर नुसती लिहावयाची नाही तर ती 'सजवायची' आहे. सजविणे या शब्दप्रयोगातून त्याची सौंदर्य दृष्टी स्पष्ट होते. बखरकार हा कथनकार आहे. प्रत्यक्ष पाहिलेल्या आणि ऐकलेल्या प्रसंगाच्या आणि व्यक्तीच्या वर्णनांशी तो एकरुप होतो. त्यात आपल्या कल्पनेचे रंग भरतो. हे रंग इतके गहिरे असतात की, तो प्रसंग आणि ती व्यक्ती आपल्यापुढे साक्षात उभी राहते. त्यांच्या एकरुपतेमुळे कोरडे तपशिलही जिवंत होऊन जातात. त्यातील भावनेची विलक्षण उत्कटता वाचकांच्या मनाला भिडते. बखरकारांच्या निवेदनाला रंग, रुप आणि आकार प्राप्त होऊन त्यातून सुंदर वाङ्‍मयीन मुर्ती निर्माण होते.*

खबर (वार्ता, समाचार, वृत्त) या अरबी शब्दाचा विपर्यास होऊन 'बखर' शब्दाची निर्मीती झाली आहे. बक म्हणजे बोलणे या धातुपासून बखर शब्दाची निर्मीती झाली असावी असे इतिहासाचार्य राजवाडे यांना वाटते. बखर या शब्दाचा रूढ अर्थ राजकीय स्वरुपाचे ऐतिहासीक लेखन असा आहे. मुसलमानामध्ये तवारिखा लिहीण्याची पद्धत होती म्हणून मुसलमानांच्या सहवासाने, त्यांच्या तवारिखा पाहून, मराठयांनिही बखरी लिहीण्याचा प्रघात पडला, असे राजवाडे म्हणतात. रचना काळाच्या दृष्टीने 'महिकावतीची बखर' ही सर्वात जुनी बखर होय. धर्मरक्षणासाठी जाती मेळावे भरवून महाराष्ट्र धर्मरक्षिका जगदंबा प्रसन्न करुन घ्यावी. अशा आशयाची आवाहने या बखरीत जागोजाग आलेली आहेत. बखरीचे स्थुलमानाने पाच वर्ग पडतात ते असे,

१. समकालीन बखरकाराने समक्ष पाहीलेल्या किंवा ऐकलेल्या राजकीय घटना प्रसंगावर आधारीत बखरी सभासदाची बखर किंवा भाऊसाहेबांची बखर या प्रकारात मोडतात.
२. केवळ स्मृतीवर हवाला ठेवून, आठवणी दंतकथा, आख्यायिका, पारंपारिक हकिगती यांच्या आधारे लिहीलेल्या उत्तरकालीन बखरी अशा बखरीमध्ये काल विपर्यास, व्यक्ती विपर्यास व स्थल विपर्यास होण्याची शक्यता असते. कृ.वि.सोहनी विरचीत पेशव्यांची बखर या प्रकारात मोडते.
३. ऐतिहासीक कागदपत्रे, जुने ग्रंथ, दप्तरातील टिपणे यांच्या आधारे लिहीलेल्या उत्तरकालीन बखरी मल्हार रामराव चिटणीस विरचीत सप्त प्रकरणात्मक चरित्र या सदरात मोडते.
४. प्रत्यक्ष बखर हे नांव न दिले तरी बखरसदृश्य ऐतिहासीक स्वरुपाचे लेखन हा बखरीचा चौथा प्रकार उदा. वाका, कैफियत हकिकत चरित्र आत्मचरित्र इ. लेखन पटवर्धनी वाका, आंगऱ्याची हकिकत, भाऊसाहेबांची कैफियत हे लेखन या वर्गात समाविष्ठ होईल.
५. ऐतिहासिक किंवा राजकीय विषय नसलेल्या परंतू बखर हे नांव असलेल्या बखरींचा हा वर्ग होय. या बखरी पौराणीक व सांप्रदायीक स्वरुपाच्या असतात. या बखरींचे स्वरुप श्रद्धामय असून केवळ ते धार्मिक भूमिकेने केलेले असते.

उदा. समर्थाची बखर, कृष्णजन्म बखर, बकासुराची बखर इ.

बहुतेक सर्व बखरींचे लेखन गद्यातून झालेले आढळते. गद्यपद्यमिश्रित अशी महिकावतीची बखर हाच काय तो एक अपवाद.. बहुतेक बखरकार हे सरकार दरबारचे अश्रित किंवा कारकून पेशातील असल्यामुळे बखरलेखनाची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. बखरीचा प्रारंभ पुराणपद्धतीचा असतो आणि शेवट फलश्रुतीमय असतो.

**बखर :— एक वाड्मय प्रकार.**

विषय आणि लेखनाची पद्धती यामुळे बखरीस एक स्वतंत्र वाड्:मयप्रकाराचे मूल्य प्राप्त झाले आहे. बखरकार हा कलावंत आहे. त्याला बखर नुसती लिहावयाची नाही तर ती 'सजवायची' आहे. सजविणे या शब्दप्रयोगातून त्याची सौंदर्य दृष्टी स्पष्ट होते. बखरकार हा कथनकार आहे. प्रत्यक्ष पाहिलेल्या आणि ऐकलेल्या प्रसंगाच्या आणि व्यक्तीच्या वर्णनांशी तो एकरुप होतो. त्यात आपल्या कल्पनेचे रंग भरतो. हे रंग इतके गहिरे असतात की, तो प्रसंग आणि ती व्यक्ती आपल्यापुढे साक्षात उभी राहते. त्यांच्या एकरुपतेमुळे कोरडे तपशिलही जिवंत होऊन जातात. त्यातील भावनेची विलक्षण उत्कटता वाचकांच्या मनाला भिडते. बखरकारांच्या निवेदनाला रंग, रुप आणि आकार प्राप्त होऊन त्यातून सुंदर वाड्मयीन मुर्ती निर्माण होते. भाऊसाहेबांच्या बखरीत असे जिवंत आणि नाटयपूर्ण प्रसंग कितीतरी आढळतात. वीर आणि कारूण्याचा प्रत्यय सतत देणाऱ्या या बखरी म्हणजे प्राचीन मराठी 'गद्य सारस्वताचा एक स्वतंत्र विलास' आहे. बखरीतील व्यक्ती आणि प्रसंग निर्मीतीमागे बखरकाराचे व्यक्तीमत्व उभे असते. कल्पकता, सुक्ष्मनिरीक्षण आणि निवेदन कौशल्य बखरीत आढळते. 'भावनापूर्ण लेखन' हे बखरीचे वैशिष्ठय.आलंकारीक भाषाषैली, कल्पनारचना, सुभाषिते, म्हणी, वाक्प्रचार यांचा वापर पौराणिक संदर्भाचे दाखले आणि बखरकाराच्या शैलीची जोड यामुळे बखरकार उत्तम कलावंत आहे हे जाणवते.

RESEARCH JOURNEY

'सभासद बखर' ही ऐतिहासीक दृष्टया महत्वाची आहे. कारण शिवाजी महाराजांचे ते पहिले चरित्र आहे. शिवाजींच्या जीवनातील महत्वाचे प्रसंग, महत्वाच्या घटनांची विस्तृत वर्णने, चरित्रातील महत्वाच्या व्यक्तींची वर्णने वाचताना बखरकाराने बखरलेखन सजविण्याकडे कसे जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे हे दिसून येते. उदात्तता, अद्भूतता, संयम, आवेश, अलंकार, निवेदन कौशल्य, बखरकाराची सौंदर्यदृष्टी, वर्ण्यविषयांशी एकरुपता इत्यादी विशेष दिसून येतात.

**व्यक्ति वर्णने :—**

सभासद बखरीमध्ये दोन प्रकारची व्यक्तीवर्णने दिसून येतात. त्यातील पहिला प्रकार म्हणजे साक्षात पद्धतीचे व्यक्तिवर्णन होय. यामध्ये लेखक व्यक्तिचित्रण करीत असतो.

उदाहरणार्थ — अफजलखानाचे वर्णन करताना 'अफजलखान सामान्य नव्हे, केवळ दुर्योधनच जातीने होता. अंगाचा, बळाचाही तैसाच आणि दुष्ट बुद्धीने तैसाच' अशा समर्पक शब्दाचा वापर केला आहे. शाहिस्तेखानाच्या बादशाही वैभव आणि दराऱ्याची सुचकतेने यथार्थ कल्पना आणून देताना ''नबाब शास्ताखान म्हणजे सर्व बादशाहाची प्रतिमाच दुसरी. ऐसा सेनासमुद्र सर्व संपत्तीनीशी दक्षिणेस राजियावर चाल करुन आला.

दिलेरखानाच्या सामर्थ्याचे वर्णन करताना, दिलेरखान म्हणजे मोठा बळकट. एक हत्तीचे बळ किंवा जास्तीचे होईल आणि हत्ती बराबर खाणे. दररोज हत्ती खातो तेणेप्रमाणे वजन खाणे. शरीर तर दुसरा हेडंब

राक्षसच 'ऐसा थाटे' अशा नेमक्या शब्दांचा वापर केल्यामुळे ते वाचनीय ठरते. भट, गोसावी, थोर पंडीत, चार वेद, सहा शास्त्रे, योगाभ्यास संपन्न, ज्योतिष, मांत्रीक सर्व विद्येने निपुन, कलीयुगाचा ब्रम्हदेव, असे पंडीत या शब्दात गागाभट्टाचे वर्णन केले आहे.

व्यक्तिवर्णनाचा आणखी एक प्रकार असून त्याला प्रतिबिंबात्मक व्यक्तीचित्रण म्हणतात. व्यक्तीच्या उद्गारातून व संवादातून ते सुचित होत असते. अफजलखान बडी बेगमा साहेबिणीच्या समोर म्हणतो, ''शिवाजी काय ? चढे घोडयानिशी जिवंत कैद करुन घेऊन येतो.'' त्याच्या या उद्गारात उद्दामपणा दिसून येतो. शत्रुच्या अभयपत्राबद्दल वाटणारी तुच्छता, शिवाजी बद्दल वाटणारी उत्कट स्वामीनिष्ठा व अभयपत्र न घेण्याचा पक्का निश्चय व्यक्त करताना मुरारबाजी दिलेरखानास म्हणतो, ''तुझा कौल म्हणजे काय? मी शिवाजी राजाचा शिपाई, तुझा कौल घेतो की काय?''.

अशा प्रकारे या बखरीतील व्यक्तिचित्रणे वेधक असून, लेखकाने समर्पक, नेमक्या शब्दांचा वापर केल्यामुळे त्यांना वेधकपणा प्राप्त झाला आहे. लेखकाच्या भाषाशैलीचे ते वैशिष्ठय आहे.

**समर्पक वस्तुवर्णने :**

कृष्णाजी अनंत सभासद यांनी या बखरीत वस्तुंची वर्णने समर्पक शब्दात केली आहेत. पतकांच्या (पथक) साजाचे वर्णन साधे असून कलादृष्टया त्यात एक विशिष्ठ सत्य आहे. त्यामुळेच या वर्तनाला एकजिनसीपणा प्राप्त होऊन ते मोहक झाले आहे. उदाहरणार्थ 'डोईस मंदील', आंगास सखलादी फतू, दोहो हाती दोन सोन्याची कडी कोणास रूप्याची कडी, तरवारास अबनाळ तैनाळ, सोने रूप्याचे, बंदुकीस कटरूप्याचे व विटियासी कर तैसेच, कानास जोडी कुडक्यांची, येणेप्रमाणे अवघे लोकांस साज' रायगडाचे वर्णनही पाहण्यासारखे आहे. बखरकार लिहितो, 'राजा खासा जाऊन पाहता गड बहुत चखोट, चौतर्फी गडाचे कडे ताशील्याप्रमाणे, दीड गांव उंच, पर्जन्यकाळी कडियांवर गवत उगवत नाही', आणि धोंडा ताशीव एकच आहे. याचप्रमाणे 'तक्त सुवर्णाचे', बत्तीस मणाचे नवरत्ने जडित सिंहासन सिध्द केले. तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाही.... दोन गाडीया जोडून जावे ऐशी मजबूती. 'पडकोट तरि चार चार फेरियावरि फेरे. ये जातीचा कोट' या शब्दात अनुक्रमे शिवाजीचे सिंहासन आणि येळूरकोटचे वर्णन अतिशय नेमकेपणाने केलेले आहे. हा रेखीवपणा लेखकाच्या भाषेचा विशेष गुणधर्म आहे.

**आटोपशीर निवेदन शैली –**

बखरकाराने निवेदन करताना पाल्हाळाला आवर घातलेला आहे. साधी पण परिणामकारक लघुवाक्ये वापरली आहेत. 'इतक्यात सवड पाहून नबाब बायकांतून एकीकडे होऊन तरवारिस हात घालावयासि गेला. ती नदर राजियाने धरून वार केला. खानाची बोटे तीन उडाली. तेंव्हा गलबा थोर जाहला.' 'त्याउपरि मातुश्री अग्निप्रवेश करीत होती. तिथे मांडीवर बसून गळा मिठी घालून आण घालून राहविली. 'पातशहांनी कुल नगर शृगांरिले, चौफेरी बिदीस कुंकुम केशराचे सडे रंगमाळा घातल्या. गुढिया, तोरणे, पताका, निशाणे नगरात लाविली. नगर – नागरिक लोक कोटयानकोटी राजा पाहावयास उभे राहिले. नारींनी मंगल आर्त्या अगणित उजळून राजियास वंदिले. सोने रूपियाची फुले राजियावरि उधळली.' शाहीस्तेखानावरील हल्याचा प्रसंग, शहाजीच्या मृत्यूनंतर जिजाबाईचा सहगमनाचा प्रसंग व शिवाजी भागानगरास आल्यावेळचा प्रसंग हे आटोपशीर निवेदन शैलीमुळे डौलदार झाले आहेत.

**पारंपारिक पौराणिक संदर्भ –**

कोणत्याही लेखकांवर त्याच्या समाजातील पौराणिक / पारंपारिक संस्कार झालेले असतात. लेखक आपले लेखन डौलदार, अलंकार करण्यासाठी पारंपारिक दाखल्याचा, सुभाषिताचा कलात्मकतेने वापर करीत असतो. तसेच उपमा, रूपक अनुप्रास या अलंकाराचाही वापर करीत असतो.

**उपमा –** 'मागे कौरवांचा क्षय पांडवी केला. (तेव्हा)
असा वीरावीरांस झगडा जाहला. (पौराणिक)'
'एक प्रहरी टिपरी जैसी शिमग्याची दणाणते
तैसे मावळे भांडले.

**उत्प्रेक्षा –** 'अफझलखान सामान्य नव्हे केवळ दुर्योधन जातीने होता.
अंगाचा, बळाचाही तैसाच आणि दुष्ट बुद्धीने तैसाच.'
'शिवाजी राजाही भीमच त्यानीच अफझल मारिला.

**रूपक –** 'बहादूरखान पेंडीचे गुरू आहे.'
बादशहाने 'बहुत खेद, दुखाचे पर्वत मानिले'

**वाकप्रचार –** 'गर्दीस मिळविणे, 'धुंद उठविणे, रणास येते,
रण पडणे, पोटात भय घालणे, तोंडात अंगुली घालणे,
कौल देणे.

अशा प्रकारे कृष्णाजी अनंत सभासद यांनी शिव छत्रपतीचे चरित्र लिहीत असताना त्यातील प्रसंग, व्यक्तिचित्रणे, अधिक रेखीव चित्रस्पर्शी करण्याचा प्रयत्न केला आहे. परकीय भाषेतील शब्द, संमीश्र शब्दरचना वाक्प्रचार वेगवेगळया प्रकारचे व्याकरणिक विशेष आणि सुभाषितांचा वापर केलेला आहे. त्यामुळे हे चरित्र वाङ्मयीन वैशीष्ठयांनी सजलेले दिसून येते.

RESEARCH JOURNEY

**संदर्भग्रंथ :**

१. नसरिबादकर ल. रा – प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास. फडके प्रकाशन, कोल्हापूर सप्टे. १९९७
२. प्रा. मारवाडे नरेंद्र व प्रा. सोलापुरे सुशीला – मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (प्रारंभ ते १६००) कैलास पब्ली. औरंगाबाद जुलै २००९
३. सरदार गं. बा. – संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रृती. लोकवाङ्मय गृह – चौथी आवृत्ती श्रीविद्या प्रकाशन १९८२
४. डॉ. मारवाडे नरेंद्र व डॉ. सरकटे सदाशिव – मध्यमयुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (१६०१ ते १८१८) कैलास पब्लीकेशन औरंगाबाद
५. पुंडे दत्तात्रय – वाङ्मयेतिहासाची कल्पना – प्रतिमा प्रकाशन पूणे. चौथी आवृत्ती २००९.
६. कुलकर्णी श्रीधर रंगनाथ – मध्ययुगीन मराठी साहित्य – एकपुनर्विचार राजहंस प्रका. पुणे १९९५.
७. ढेरे रा. चि. – संतसाहित्य आणि लोकसाहित्य : काही अनुबंध. श्रीविद्या प्रकाशन पूणे १९७८.